जिल्हा होमगार्ड कार्यालय, बीड
आवरगावकर बिल्डींग, साठे चौक, बीड- 431 122
दुरध्वनी क्रं. 02442-222391 EMAIL ID- dchgbeed@yahoo.com

जा.क्रं. 355/ प्रशा/2024 दिनांक 01/09/2024

---

# बीड जिल्हा होमगार्ड नोंदणी -2024
# उमेदवारांचे प्राप्त गुणांबाबत आक्षेप- जाहीर अधिसुचना

बीड जिल्हयातील होमगार्ड सदस्यांचा अनुशेष पुर्ण करणेकरीता दिनांक 23/08/2024 ते दिनांक 28/08/2024 या कालावधीत होमगार्ड नोंदणी प्रक्रिया पार पाडण्यात आलेली आहे. तसेच दिनांक 24/08/2024 व दिनांक 25/08/2024 रोजी पावसामुळे पुरुष उमेदवारांच्या मैदानी चाचण्या घेणे शक्य नसल्याने सदर उमेदवारांच्या मैदानी चाचण्या हया दिनांक 28/08/2024 रोजी घेण्यात आलेल्या आहेत.

दिनांक 23/08/2024, 26/08/2024 , 27/08/2024, आणि दिनांक 28/08/2024 या कालावधीत घेण्यात आलेल्या मैदानी चाचणीमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेले गुण सोबत जाहीर करण्यात येत आहेत.

उमेदवारांना या अधिसुचनेद्वारे कळविण्यात येते की, सदर जाहीर केलेल्या गुणांमध्ये कोणाला काही आक्षेप नोंद करावयाचा असेल त्यांनी आपला आक्षेप जिल्हा होमगार्ड कार्यालय यांचे EMAIL ID- dchgbeed@yahoo.com यावर अथवा जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालय, बीड, आवरगावकर बिल्डींग, साठे चौक, बीड- 431 122 येथे दिनांक 03/09/2024 रोजी सायंकाळी 21.00 वाजे पावेतो नोंदवावा. सदर कालावधी नंतर आपला कोणताही आक्षेप स्विकारला जाणार नाही.

सदर आक्षेप नोंदविताना आपला अर्ज नोंदणी क्रमांक, चेस्ट क्रमांक, मोबाईल क्रमांक, आणि ज्या बाबी संदर्भात आपला आक्षेप आहे ती बाब, ईत्यादी संदर्भ स्पष्टपणे नमुद करावेत अन्यथा आपला आक्षेप स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

01/9/24

(सचिन पांडकर)
जिल्हा समादेशक होमगार्ड बीड
तथा अप्पर पोलीस अधिक्षक, बीड